# <u>पयलं नमन हो करितो वंदन</u>

पयलं नमन हो कार्यक्रम छान छा ऽऽ न

दारात मांडिली आरास सुंदर, त्यावर सजली मखरी गवर

सख्या हो जमल्या नेसुनी चंदेरी, शोभून दिसती विविध अलंकारी

हळद कुंकवानं गुलाबपाण्यानी, दारात करिती स्वागत हर्षुनी

सभागृही आल्या हो ललना नटून, आसमंत गेला हो अति गजबजून

सुरुवात झाली ती सुंदर गीताने, पाहुण्यांना आणले व्यासपीठी मानाने

आजचा कार्यक्रम असे हो आगळा, चार अवलियांचा प्रवास वेगळा

माधुरी शीतलनी केले की कथन, साऱ्या भगिनी हो पहा गेल्या भारावून

विशिष्ट ध्येयाने बावीस देश फिरले, तिथल्या मातांचे प्रश्न हो ऐकले

साडी चोळी देऊनिया केला हो सन्मान, साऱ्या भगिनी हो गेल्या विचारी रंगून

सिंधूताईंनी हो त्यांची दृष्ट ती काढली, डाळ पन्हं देऊनिया सांगता ती केली.

रागिणी बापट

२४ एप्रिल  २०१९